# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परिक्षा व मुल्यमापन मंडळ

कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल : coegondwana@gmail.com


जा. क्र. गों.वि./परिक्षा वि./३५६७/२०२४

दिनांक : ५/०९/२०२४

## अधिसुचना

**विषय:**– "कॅरी फॉरवर्ड" च्या पध्दतीनूसार शैक्षणिक सत्र २०२४–२५ करीता विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत.

**संदर्भ:**– मा. विद्या परीषद तातडीची सभा दिनांक ०४/०९/२०२४.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्य, विभागप्रमुख पदव्यूत्तर शैक्षणिक विभाग, विद्यार्थी तसेच संबधितांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भानूसार "कॅरी फॉरवर्ड" च्या संदर्भात विद्यार्थी संघटनेकडून निवेदन प्राप्त होत असल्याने शैक्षणिक सत्र २०२४–२५ मध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना खालीलप्रमाणे अटी व शर्तीच्या अधीन राहून कार्यवाही घ्यावी.

१. प्रथम सत्रात अनूत्तीर्ण विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्षामधील तिसरे सत्र, पाचवे सत्र, सातवे सत्र व नववे सत्रात प्रथमत: २५ टक्के प्रवेश शुल्क आकारुन प्रवेश देण्यात यावा. तसेच, सदर विद्यार्थी हिवाळी २०२४ च्या सत्रामध्ये अनुत्तीर्ण असलेल्या विषयाची व इतर नियोजित विषयाची परीक्षा देईल. वरील नुसार हिवाळी २०२४ मध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यास संबंधित शैक्षणिक वर्षाचे उर्वरित ७५ टक्के शुल्क भरावे लागेल, जर हिवाळी परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास त्यांनी भरलेले शुल्क परत मिळणार नाही.
२. संबंधित विद्यार्थ्यांकडून वरील सत्राच्या परीक्षेचे संपूर्ण प्रवेशाची प्रवेश फी व परीक्षेचे परीक्षा शुल्क पुर्णपणे आकारण्यात येईल मात्र संबंधित विद्यार्थी सदर सत्राच्या परीक्षा उन्हाळी–२०२५ मध्ये देईल.
३. सदर विद्यार्थ्यास संबंधित शैक्षणिक वर्षाचे संपूर्ण २५ टक्के शुल्क भरावे लागेल. जर हिवाळी परीक्षेत अनूत्तीर्ण झाल्यास त्याने संपूर्ण भरलेले शुल्क परत मिळणार नाही व त्याने घेतलेला प्रवेश आपोआप रदद समजण्यात येईल.
४. विद्यार्थी हिवाळी परीक्षेत पास झाल्यास सदर विद्यार्थी त्या शैक्षणिक सत्रातील नियमित सत्रात प्रवेश घेण्यास पात्र झाला असे समजून याला दोन्ही सत्राचे पेपर उन्हाळी परीक्षेमध्ये दयावे लागतील. सत्राची ७५ टक्के शिक्षण शुल्क भरणे आवश्यक राहिल.
५. मात्र ही सवलत फक्त सत्र २०२४ – २५ करीता लागू राहिल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

05/09/24
( डॉ. श्याम खंडेरे )
संचालक (प्रभारी)
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रतिलिपी:–

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
२. मा. प्र–कुलगुरू महोदय, यांचे कार्यालय गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
४. मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
५. संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदर अधिसुचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याकरीता सादर.
६. समन्वयक, एमकेसीएल. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना पुढील कार्यवाहीस सादर.